
कबुतरांची भाषा



रोज़मेरी वेल्स


मराठी: अश्विनी बर्वे

जूलियटच्या सहाव्या वाढदिवसाच्या दिवशी आजोबांनी त्याला दोन भेटवस्तू दिल्या. त्यातील एक ब्रुकलिनच्या छतावरील एक कबुतर होते, दुसरी भेटवस्तू म्हणजे महा युद्ध्याची कहाणी आहे.

केवळ नऊ वर्षाच्या एका अनाथ मुलाच्या रुपात आजोबांनी इतालवी सेनेत लढाई लढली. आजोबा त्या कबुतरांची काळजी करत असत जे शत्रूंचा गोळीबार होत असतांना गुप्त संदेश पोहचवत असत. आणि त्या जुन्या दिवसांची एक आठवण म्हणून ते अजूनही जीवित होते.

जूलियटने आपल्या आजोबांच्या कहाणीत वर्णन केलेल्या पक्ष्याचे नाव आपल्या वाढदिवसाच्या वेळी मिळालेल्या कबुतराला दिले ते म्हणजे "इसाबेला". आजोबा म्हणाले इसाबेलाला घरी नेण्याच्या आधी जूलियटला कबुतरांची भाषा शिकायला हवी. पण ते कसे शक्य होईल?

कबुतरांची भाषा



रोज़मेरी वेल्स
चित्र: ग्रेग शेड

लेखकाचे मत

हजारों वर्षापासून लोक हवेच्या माध्यमातून निरोप पाठवण्यासाठी पाळीव कबुतरांचा उपयोग करत आले आहेत. पहिल्या विश्व युद्धात विशेषकरून कबुतरांच्या वीरतेच्या कहाण्या प्रसिद्ध झालेल्या सापडतात. दुश्मन सैनिकांसाठी जवळ जवळ अदृश्य असणारे कबुतरे गुप्त संदेशाचे वाहक होते जे कोणतीही रहस्ये कोणत्याही स्थितीत उघड करत नसत. पंख असणाऱ्या या नायकांनी दोन्ही कडच्या सैनिकांचे आणि नाविकांचे प्राण वाचवले. पक्ष्यांना सम्मान पदक आणि एक देशाकडून मिळणारा सर्वोच्च सैन्य सम्मानसुद्धा दिला गेला. आजही अनेक देशांच्या सशस्त्र सेनेकडून त्यांची आठवण काढली जाते ज्यांचे जवान त्या भयानक युद्धात लढले होते.

मी आत्ता आजोबा आणि मी त्यांच्या ब्रुकलिनयेथील गच्चीवर बसलेले बघत आहे. तो माझा सहावा वाढदिवस आहे आम्ही केप, न्यू-जर्सीहून आजोबाची कबुतरे घरी येण्याची वाट बघत आहोत. आज सकाळीच त्यांना रेसिंग कबुतरांच्या इतर थव्या बरोबर ट्रकने इकडे आणले जात होते. माझे आजोबा आकाशाकडे बघत आहेत, “मी नेहमी कबुतरांची भाषा बोलतो, जूलियट,“ त्यांना असे सांगणे आवडते.

आजोबांनी महान ऑपेराच्या नावाने आपल्या कबुतरांची नावे ठेवली होती : मार्सेलिना, ओटावियो, एल्विरा, अल्फ्रेडो. मी काही बोलण्याच्या आधी, मला त्यांची नावे कळली होती.






आज आजोबांनी माझ्या वाढदिवसाच्या दिवशी एका कबुतराची भेट दिली. ते कबुतर दुसऱ्या कबुतरांबरोबर उडण्यासाठी अजून लहान होते. ते गुलाबी भुऱ्या रंगाचे होते आणि त्यावर कोकोच्या रंगाचे पंख होते. अशा पंखांचे रंग असणाऱ्या कबुतरांना "इसाबेला" म्हटले जाई, आजोबा मला म्हणाले. "मी पण त्याला याच नावाने हाक मारेन." मी आजोबांना सांगितले.


आजोबा ब्रुकलिनच्या आकाशाकडे काहीसे नाराज होऊन बघत होते कारण ते न्यूजर्सीच्या आकाशाशी जोडलेले होते. "मी आज तुला अजून एका इसाबेलाच्या बाबत सांगतो," ते मला म्हणाले, "इथे इटलीत, खूप पूर्वी आणि खूप दूरची गोष्ट आहे.

मग माझ्या सहाव्या वाढदिवशी मी आजोबांची ती कहाणी ऐकली.

मला कोणी आईवडील नव्हते. माझे पालनपोषण फ्रांसिस्कन ब्रदर्सद्वारे एका मठात इतर अनाथ मुलांबरोबर झाले. मला भांडायला आवडत नसे, म्हणून मी गच्चीवरच्या बागेत एकटा बसत असे. त्या बागेत ऑलिव्ह आणि अंजीराची झाडे होती आणि शेकडो वर्षांची जुनी सेंट फ्रांसिसची एक मूर्ती होती. तिथे लाल फरशीच्या छताच्या खाली एक कबूतरखाना होता, जो पहाडावरील हवेसाठी उघडा होता.

जेव्हा मी सुद्धा तुझ्यासारखा सहा वर्षांचा होतो, तेव्हा मी पक्ष्यांची देखभाल करायला शिकलो. मग त्यांची भाषा बोलायला शिकलो. जेव्हा मी सात वर्षांचा झालो, मला गटाचा प्रमुख म्हणून निवडले. तिथे ऐंशी पक्षी होते. मी त्यांना प्रत्येकाला नावाने ओळखत होतो. पण माझ्या आवडीचा पक्षी म्हणजे पाऊसाच्या ढगांचा रंग असणारी एक मादी होती. मी तिचे नाव इसाबेला ठेवले. फ्रांसिस्कन ब्रदर्स तिला "मैड्रिना" म्हणत, ज्याचा अर्थ होता "गॉडमदर". ती माझ्यासाठी बिलकुल एका आईसारखी होती.






उन्हाळ्यात फ्रांसिस्कन भावंडे मला मशरूम गोळा करण्यासाठी जंगलात पाठवत असत. काही झाडांच्या खाली, खासकरून हरिणाच्या पायवाटेवर कडेला उगवणारे मशरूम नाजूक असत. इसाबेला, जी माझ्या खांद्यावर बसलेली असे, ती मी छोटे छोटे संदेश लिहण्याची वाट बघत असे, म्हणजे मी आचाऱ्याला कळवू शकेल की आज मला काय मिळाले आहे. मी तिच्या पायाला चारी बाजूने कागद गुंडाळत असे आणि तिला परत पाठवून देत असे. त्यामुळे आचाऱ्याला कळे की त्या रात्री स्वयंपाक करण्यासाठी काय तयारी करायची आहे.

मला वाटे की हे शांत जीवन नेहमी राहिल.पण एक दिवस महायुद्ध सुरु झाले. त्यानंतर लगेचच सेनेने मठावर हल्ला केला. त्यांनी सगळ्यात मोठ्या मुलांना आणि सगळ्या कबुतरांना ओढून नेले.

माझ्या इसाबेलाशिवाय मला राहवेना मी दुःखात बुडून गेलो आणि सात दिवस मी जेवलो नाही. पण सुदैवाने दोन सैनिक परत आले. त्यांनी कबुतरांच्या प्रमुखाची मागणी केली, कारण सार्जेंट त्या कबुतरांकडून काहीच काम करून घेऊ शकत नव्हता. अशाप्रकारे नऊ वर्षांचा असतांना मला सेनेत भरती केले गेले.



कोणीही मला हे सांगू शकले नाही की आल्प्समध्ये इटालियंस, ऑस्ट्रियाई सेनेशी का लढत होते. मला त्याची पर्वा नव्हती कारण मी कोणत्याही लढाईपासून खूप दूर होतो, आणि कबुतरांसाठी आणि माझ्यासाठी मोठ्या प्रमाणावर अन्न होते.

एक दिवस दोन लेफ्टनट माझ्या कॅप्टनच्या स्थानावर थांबले. त्यांना युद्धात तीन कबुतरांना नेण्याची इच्छा होती. त्यांनी माझ्या सगळ्यात चांगल्या कबुतरांना, ब्रूनो आणि अल्बर्टो यांना निवडले-मग त्यांनी इसाबेलाला निवडले. मी गयावया केली आणि रडलो आणि त्यांना म्हटले की ती अजून अप्रशिक्षित आहे, ती काही खास चांगली नाही. पण त्यांनी म्हटले की इसाबेलाचा रंग शत्रुंसाठी अदृश्य असेल त्यांना ती दिसणार नाही, म्हणून ते तिलाही जबरदस्तीने घेऊन गेले.

मला खूप दिवस कळले नाही की पहाडांवर काय झाले? पण जेव्हा सैनिक परत आले तेव्हा त्यांनी मला सांगितले की त्यांनी काय बघितले.





युद्धाच्या पहिल्या तीन दिवसांत दोन सैनिक मारले गेले. जेव्हा असे झाले तेव्हा ब्रूनोच्या पायावर मदतीसाठी एक संदेश बांधला गेला, ज्यात सांगितले गेले की आमची सेना कुठे लपली आहे. पण ब्रूनोला ऑस्ट्रियाच्या लोकांनी गोळी मारली आणि तो संदेश शत्रूच्या हातात सापडला.

पुढच्या आठवड्यात अजून काही सैनिक मारले गेले. जेव्हा असे झाले तेव्हा अल्ब्रेटोच्या बरोबर मदतीसाठी संदेश पाठवला गेला. पण ऑस्ट्रियाच्या लोकांनी कबुतरांना पकडण्यासाठी गरुडांना प्रशिक्षित केले होते. कदाचित अल्बर्टोला मध्येच हवेत पकडले गेले. कारण तो आणि त्याचा संदेश कुठेही सापडला नाही..



जेव्हा फक्त एक डझन माणसे राहिली तेव्हा, इसाबेलाला हवेत सोडले गेले. जेव्हा ती एका देवदार वृक्षावर आराम करत होती तेव्हा एका ऑस्ट्रियायन निशाणेबाजाने तिला गोळी मारली. ती स्तब्ध आणि रक्ताळलेली होऊन जमिनीवर पडली. निशाणेबाजाने परत गोळी चालवली.


त्यावेळी मला याबाबत काहीच माहीत नव्हते. मी शिबिरात वाट बघत होतो आणि फक्त माझ्या पंख असणाऱ्या तीन मित्रांबद्दल विचार करत होतो. ज्या ठिकाणी माझे हृदय धडधडत होते ते एक मोकळे ठिकाण होते जिथे थंड हवा वाहत होती. रात्रभर मी इसाबेलाच्या पंखाचा कोमल आवाज ऐकण्यासाठी मी बैचेन होतो. जगात माझ्या वयाच्या नऊ वर्षाच्या काळात मी फक्त या छोट्या ढगासारख्या रंग असणाऱ्या छोट्या पक्ष्याचे प्रेम मला माहीत होते.

बारा दिवस बारा महिन्यांसारखे गेले. इसाबेला आली नाही. मी विचार केला की मी मोठा होऊन असा माणूस होईल जो आयुष्यभर वर आकाशात बघेन, कधीतरी ती मला दिसेल.

तेव्हा सूर्यास्ताच्या वेळेस मला वाटले की माझ्या तंबूच्या जवळ चिख्खल ओलांडून एक उंदीर येत आहे. पण तो उंदीर नव्हता. ती माझी इसाबेला होती जी मोठ्या मुश्किलीने पंख पसरून माझ्याकडे येत होती. ती जवळपास मेली होती.

आमच्या सैनिकांचे ठिकाण सांगणारी चिठ्ठी अजूनही तिच्या पायावर चिकटलेली होती. तिच्या शौर्यामुळे आठ माणसे जिवंत राहिले.

मी तिला स्वच्छ केले, खायला घातले आणि तिच्या जखमी पंखांची देखभाल केली.मग मी तिला आपल्या कोटाखाली लपवून ठेवले म्हणजे ती लवकर बरी होईल आणि कोणी तिला परत घेऊन जाणार नाही.



"इसाबेला आपल्या नंतरच्या वर्षात माझ्या खांद्यावर आरामात बसून राहिली," आजोबांनी मला सांगितले. "पण तुला माहीत आहे की ती एक प्रसिद्ध कबुतर होती. युद्धसंपल्यावर इटालियन हाय कमांडने तिला जांभळ्या रिबिनीने बांधलेल्या रजत पदकाने सन्मानित केले."

आजोबांनी आपले पाकीट काढले आणि मला एक जुना फोटो दाखवला, तो एवढा जुना आणि फिकट झाला होता, मी मोठ्या मुश्किलीने त्या छोट्या पक्ष्याला शोधू शकली. पण तो एका अशक्त हसऱ्या मुलाच्या खांद्यावर बसलेला होता.






माझी इसाबेला माझ्या बरोबर क्वींसमध्ये फ़ॉरेस्ट हिल्सच्या मेट्रोतून घरी येते. मी तिला जाळीच्या छोट्याशा बॉक्समधून घेऊन जाते.

दर सोमवारी सकाळी शाळेच्या आधी मी इसाबेलाला उडू देते. मला आशा असते की ती परत माझ्याकडे येईल. पण त्याऐवजी ती वेगाने ब्रुकलिनमध्ये आजोबांच्या घरी पोहचते. आजोबांची भेट रविवारी घेतल्याशिवाय ती परत माझ्याबरोबर येईल असे वाटत नाही.

“तिला रस्ता कसा कलतो?” मी आजोबांना विचारले.

ते म्हणाले, “काही लोक म्हणतात की कबुतरे चर्चची मिनारे लक्षात ठेवतात. दुसरे म्हणतात की पृथ्वीची चुंबकीय शक्ती त्यांना मार्गदर्शन करते. पण मला वाटते की कबुतर वास घेऊ शकतात आणि तो वास फक्त पक्षीच ओळखू शकतात.”



एका वर्षानंतर मी इसाबेलाला आपल्या घरी येण्याचे प्रशिक्षण देणे सोडून दिले. मनातून माझा पक्षी ब्रुकलिनची एक मुलगी आहे, म्हणून जेव्हा मी तिला सोमवारी सकाळी सोडून देत असे त्याच्या पायाला जोडलेल्या अल्युमिनियमच्या कॅप्स्यूलमध्ये नेहमी आजोबांसाठी ‘आय लव्ह यू’ चा संदेश असे.

मी नऊ वर्षाची होण्याच्या आधी येणाऱ्या रविवारी आजोबांनी आणि मी गच्चीवर वाढदिवसाची पार्टी ठेवली.

“तुम्हांला वाटते का आजोबा इसाबेला कधी माझ्याजवळ येईल?” मी विचारले.


"ओह, हो,“ त्यांनी उत्तर दिले. “जर तुला कबुतरांची माहीत असती तर.”



माझ्या वाढदिवसाच्या एक आठवड्यानंतर पहाटे माझा फोन वाजला. जेव्हा मी माझ्या आईला आणि वडिलांना रडतांना ऐकले तेव्हा मला अंदाज आला की आजोबांचा मृत्यू झाला.

त्यादिवशी मी शाळेत न जाता घरीच राहिले. मी केवळ इसाबेला आणि आजोबांच्या बरोबरच्या रविवारबद्दल विचार केला, जो पृथ्वीच्या किनाऱ्यावरून सूर्यासारखा गायब झाला होता.

आजोबांच्या आठवणीत ब्रुकलिन चर्चमध्ये एक अधिक काळ चालणारी सेवा झाली होती आणि मग आजोबांच्या घरात एका दुपारी जेवण आयोजित केले होते. मला लोकांच्या गप्पांमध्ये किंवा फॅन्सी कपड्यांची सळसळ ऐकण्यात रुची नव्हती. मी त्यादिवशी माझ्या काकाने आणलेल्या शंभर पदार्थांपैकी एकही पदार्थाची चव घेतली नाही. मी पुजाऱ्यांना नमस्कारही केला नाही.मी गच्चीवर फिरत राहिले आणि मला कबुतरखाना रिकामा दिसला.



जिन्याने उतरतांना मी घाबरून आपल्या काकाला ओरडून विचारले “कबुतर कुठे आहे? माझी इसाबेला कुठे आहे?”

उत्तर आले, “त्यांना प्रॉव्हिडेस विडेंस, रोड आयलैंडमध्ये एका कबूतराच्या पालकाला विकले."

त्या रात्री मला झोप आली नाही. माझ्या आईने मला एक गोष्ट सांगून शांत करण्याचा प्रयत्न केला. माझ्या वडिलांनी माझ्यासाठी एक ग्लास गरम दूध आणले. पण शेवटी ते ही अंथरुणावर जाऊन झोपले, आणि मला उत्तरेकडच्या आकाशाकडे बघण्यासाठी एकटे सोडून दिले. मला माझ्या आजोबांचे शब्द आठवत होते. “ज्या ठिकाणावर माझे हृदय साधारणपणे धडकत होते ते रिकामे होते जिथे थंड हवा वाहत होती.”


पाच वाजता माझे डोळे मिटले, पण सहा वाजता माझ्या खिडकीवर खुडबूड आवाज आला, ती इसाबेलाच असणार. ती प्रथमच माझ्याकडे परत आली. शक्य आहे की तिने आजोबांच्या ब्रुकलिन येथील घरातील गच्ची बघितली असणार आणि ते रिकामे बघितले असेल. ती लांबून उडून आल्यामुळे ती थकली होती म्हणून मी तिला आपल्या उशीवर ठेवले.



तिच्या पायाच्या चारी बाजुला माझा अल्युमिनियम संदेशाची कॅप्सूल अजूनही बांधलेला होता. असे वाटले जसे आजोबांचा मी लिहलेला शेवटचा “आय लव्ह यू” संदेश वाचायचा राहिला होता. कॅप्सुल उघडल्यावर मला एक नवीन संदेश दिसला.

पण ते माझे लिखाण बिलकुल नव्हते. ते माझ्यासाठी आजोबांच्या काळातील लिखावटीमध्ये हाताने लिहलेला संदेश होता.”

“ते तुला काहीही सांगतील त्यांचे एक ऐकू नको.कबुतरांची भाषा शिकल्यावर मी उडायला सुद्धा शिकलो आहे. आता बघ मी परत येईन.”



आणि हो, इसाबेला आणि मी नेहमी असेच करतो.

अंत